//सा विद्या या विमुक्तये //
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णूपुरी, नांदेड-४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)
Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade
ACADEMIC (AFFILIATION) SECTION
Phone : (02462) 229242/43
Fax : (02462) 229245 / 229325
Website : srtmun.ac.in
E-mail : affi.srtmun@gmail.com

# :: परिपत्रक ::

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात शैक्षणिक वर्ष **२०१८-२०१९** करिता संलग्नित महाविद्यालयासाठी संलग्नीकरणाचे नुतनीकरण/तुकडीची नैसर्गिक वाढ /नैसर्गिक वाढ /कायम संलग्नीकरण इत्यादी साठी सादर करावयाचे विहीत नमुन्यातील आवेदन पत्र / प्रस्ताव **विद्यापीठाचे www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर दि. ०१.०९.२०१७ पासून उपलब्ध आहे.** संबंधित आवेदन पत्र / प्रस्ताव, शासन निर्णयासोबतचे परिशिष्ट "अ" अर्ज पूर्णपणे भरुन विहीत शुल्कासह व परिशिष्ट "ब" नुसार आवश्यक सर्व कागदपत्रे प्रत्येक प्रस्तावास क्रमाने लावून विद्यापीठात सादर करण्याची अंतीम तारीख **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अन्वये ३० सप्टेंबर २०१७ आहे. परंतू दिनांक ३०.०९.२०१७ (शनिवार) रोजी सार्वजनिक सुट्टी (दसरा) असल्यामुळे अंतिम तारीख २९.०९.२०१७ (शुक्रवार) ही राहील.**

संलग्नित महाविद्यालयासाठी संलग्निकरणाचे नुतनीकरण/ कायम संलग्निकरण ईत्यादी साठी आवेदनपत्र/प्रस्ताव सादर करतेवेळी खालील बाबींची विशेष काळजी घ्यावी.

१. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र आवेदनपत्र / प्रस्ताव सादर करावे.

२. प्रस्ताव/आवेदपत्रामधील सर्व रकाने पूर्णपणे भरावेत. अर्धवट भरलेले प्रस्ताव/आवेदनपत्र स्वीकारले जाणार नाहीत. नजरचुकीने स्वीकारलेल्या अर्धवट आवेदनपत्रावर/प्रस्तावावर संलग्निकरणाबाबतची पुढील कार्यवाही केली जाणार नाही.

३. प्रस्ताव/आवेदनपत्रासोबत विहीत शुल्काचा धनाकर्ष **(डी.डी.)** जोडणे आवश्यक आहे व तो धनाकर्ष **(डी.डी.) "वित्त व लेखाधिकारी/कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड"** यांचे नांवे असावा. कमी शुल्क भरलेल्या महाविद्यालयांच्या प्रस्तावावर पुढील कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

४. महाविद्यालयास कायम संलग्निकरण प्राप्त झाले असल्यास, त्याचा स्पष्ट उल्लेख करुन सोबत मान्यतेच्या प्रती जोडाव्यात.

५. सर्वसाधारणपणे अभ्यासक्रमाच्या मूळ तूकडीस (Basic Course) कायम संलग्निकरण प्रदान केले जाते, कोणत्याही अतिरिक्त तुकडीस कायम संलग्निकरण प्रदान करण्यात येत नाही. महाविद्यालयांनी अतिरिक्त तुकडीचे प्रस्ताव दाखल करताना कायम संलग्किरणाचे पत्र सोबत जोडणे आवश्यक आहे, अन्यथा सदर तूकडी / अभ्यासक्रमास तात्पुरते संलग्निकरण गृहीत धरुन शुल्क आकारणी केली जाईल.

६. कायम संलग्निकरणासाठी महाविद्यालयास पाच वर्ष पूर्ण होणे, शिक्षकांची नियुक्ती, नियमित सेवा, नॅक, युजीसी मान्यता इ. बाबी आवश्यक आहे. कायम संलग्निकरणाचे प्रस्ताव सादर करतांना विद्यापीठाचे परिपत्रक जा. क्र. शैक्षणिक /संलग्न ०३/२०१४-२०१५/१५६५, दि. ०७/१०/२०१४ नुसार व वेळोवेळीच्या शासन, युजीसीच्या सुधारणाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, तसेच प्रस्तावासोबत विषय / विद्याशाखांची संपुर्ण माहिती विहीत प्रपत्रात जोडणे आवश्यक आहे.

७. **संलग्नीत महाविद्यालयाच्या नूतनीकरणाच्या प्रस्तावातील प्रपत्र अ/ब/क/ड हे <u>DVBTT SUREKH या फॉन्ट</u>** मध्ये भरून सी. डी. सह दाखल करणे अनिवार्य आहे. सदर प्रपत्र नूतनीकरणाच्या अर्जासोबत/ प्रस्तावासोबत उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच संकेत स्थळावरही Word व PDF Format मध्ये उपलब्ध केले आहे. महाविद्यालयांनी संलग्निकरणाचे अर्ज / प्रस्ताव हे Spiral Binding न करता ते साध्या फाईलमध्ये दाखल करावे.

८. ज्या महाविद्यालयाकडे पुर्वीचे संलग्निकरण शुल्क बाकी आहे, त्या महाविद्यालयानी संलग्निकरण प्रस्ताव सादर करण्यापूर्वी विहीत मान्यतेनंतर संलग्निकरण शुल्क, विलंब शुल्कासह दि. १५.०९.२०१७ पर्यंत जमा करावे. सदर प्रलंबीत असलेले शुल्क न भरणाऱ्या संलग्नित महाविद्यालयाचे नुतनीकरणांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत व त्यास संबंधीत महाविद्यालय/ **संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.**

९. महाविद्यालयांनी संलग्निकरणाच्या अर्जासोबत/प्रस्तावासोबत शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ चे संलग्निकरण प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१०. संस्थेचे एकाच ठिकाणी अनेक महाविद्यालये असल्यास पदवी व पदव्युत्तर स्तरावर विषय व तुकडया **(अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित)** किती आहेत याची माहिती स्वतंत्रपणे सोबत देण्यात यावी.

११. ज्या विषयांना/तुकडयांना शासनाची अद्यापही मान्यता नाही अथवा सहसंचालकाचे NOC नाही अशांचा नुतनीकरणात समावेश करण्यात येऊ नये याची नोंद घ्यावी.

१२. पाच वर्ष पूर्ण झालेल्या महाविद्यालयांनी नॅकच्या मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकनासाठी केलेल्या **कार्यवाहीचे कागदपत्र सोबत जोडावेत.**

१३. स्वयंमुल्यांकन अहवाल (Self Assessment Report) सादर करण्याबाबत, यापुर्वी महाविद्यालयांना वेळोवेळी कळवूनही बऱ्याच महाविद्यालयांनी अजूनही सदर अहवाल विद्यापीठात दाखल केलेला नाही. त्यामुळे स्वयंमुल्यांकन अहवाल (Self Assessment Report) सादर केल्याशिवाय संलग्निकरण नूतनीकरणाचे अर्ज / प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

१४. संशोधन केंद्र प्रमुखांनी त्यांच्या महाविद्यालयास ज्या विषयाचे संशोधन केंद्र मंजूर आहे त्याच विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम चालु असणे युजीसीच्या नियमानुसार अनिवार्य करण्यात आलेले आहे. त्यास दि. ०३. ०५.२०१७ रोजी झालेल्या मा. विद्या परिषद बैठकीतील विषय क्र. १४-३८/२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे. तरी संबंधीत विषयाच्या संशोधन केंद्रानी मागील तीन वर्षात त्यांचे प्रवेश व परीक्षेस बसलेले विद्यार्थी याची माहिती प्रस्तावासोबत सादर करावी. सदर बाब विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागानेही जावक क्र. पीजी/संशोधन केंद्र/ २०१७-१८/६२, दि. ०३.०८.२०१७ अन्वये विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली आहे.

१५. सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवडयात (विशेषतः शेवटचा दोन तीन दिवसात) नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी होणा-या गर्दीचा विचार करता, संलग्नित महाविद्यायांसाठी संलग्निकरण शुल्क तपासणी कार्यक्रम हा पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| **अ. नांदेड जिल्हा** | : | **दि. ०१ सप्टेंबर तें १५ सप्टेंबर २०१७** |
| **ब. लातुर जिल्हा** | : | **दि. ०१ सप्टेंबर तें १५ सप्टेंबर २०१७** |
| **क. परभणी** | : | **दि. ०१ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०१७** |
| **ड. हिंगोली जिल्हा** | : | **दि. ०१ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०१७** |

तरी, सर्व संलग्नित महाविद्यालयांनी वरील कार्यक्रमानुसार, सार्वजनिक सुट्टया वगळुन, विद्यापीठात उपस्थित राहुन संलग्निकरण शुल्क/कायम संलग्निकरण शुल्क/नवीन मागणीसाठी प्रक्रिया शुल्क इत्यादी तपासुन आपले प्रस्ताव विहीत तारखेमध्ये किंवा त्यापुर्वी सादर करावेत.

सदरचे परिपत्रक हे प्रस्तुत विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in, या संकेतस्थळावर (Link: - bcud/bcud-circulars) प्रसिध्द करण्यात आले आहे.

"ज्ञानतीर्थ",परिसर :
विष्णुपुरी नांदेड़ :
जा. क्र. शैक्षणिक/संलग्न-०३/२०१७-२०१८/ ९९४ :
दि. ०१.०९.२०१७ :

**उपकुलसचिव**
शैक्षणिक (संलग्निकरण) विभाग

**प्रतः-**

१. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांना कळवुन विनंती की, त्यांनी आगामी माहे. सप्टेंबरसाठी, विशेषतः शेवटच्या आठवडयात **या विभागाच्या** सुचनेनंतरच कॅश काऊंटर बंद करण्यात यावे.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
४. सिस्टीम एक्सपर्ट, विद्यापीठ अनुदान आयोग कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना देवुन कळविण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. /
५. प्रशासकी य सुचना फलक (Notice Board).